4

# सल्तनतकालीन इतिहासाची पुरातत्वीय साधने

**सचिन गुंडीराम डेंगळे**
संशोधक विद्यार्थी,
प्राथमिक पदवीधर, जि.प.प्रा.शा.अजनी (बु.)
ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर

**पार्श्वभूमी :-**

इ.स. 7 व्या शतकात प्राचीन भारतातील शेवटचे बलशाली साम्राज्य हर्षवर्धनाचे होते. त्यानंतरचा कालखंड मध्ययुगीन कालखंड मानला जातो. प्राचीन भारतीय इतिहासाने भारतीयांना आणि जगाला अत्यंत समृद्धा असा सांस्कृतीक, कलात्मक आणि परधर्म सहिष्णुतावादी विचारांचा वारसा दिला. मध्ययुगीन भारताचा इतिहास अरब आणि काही अंशी धर्माच्या स्वरुपाचा होता. म्हणूनच त्याचे पडसाद भारतीय इतिहासावर या कालखंडात दिसतात. मुस्लिम आक्रमणामुळे जगाच्या इतिहासात समृद्धी आणि वारसा क्रमशः लोप पावले. हर्षवर्धनाच्या नंतर उत्तर भारतात छोटी मोठी राज्ये अस्तित्वात होती. पण त्यांच्यात संघटन नव्हते याचा फायदा परकीय सत्ताधिशांनी घेतला आणि इ.स. 11 व्या शतकापासून ते इंग्रजाच्या हाती सत्ता येईपर्यंत भारतावर या सत्ताधिशांनी आपले वर्चस्व गाजविले. या प्रदीर्घ कालखंडात राजकीय, सामाजीक, धार्मिक जीवनात या सत्ताधिशांच्या जीवनशैलीच्या पाऊलखुणा उमटलेल्या दिसतात या प्रदीर्घ कालखंडात भारतीय संस्कृती इस्लाम संस्कृती यांचे एककत्रीकरण झाल्याचे दिसते.

काही इतिहासकारांच्या मते मध्ययुगाची सुरुवात इ.स. 1001 पासून झाली तर काहींच्या मते 1206 मध्ये झाली. असे मानले जाते. परंतु एखादे युग किंवा कालखंड ठरावीक शतकात सुरु होते अथवा संपते असे होत नाही. याला प्रदीर्घ कालावधी लागतो. प्राचीन कालखंडातून मध्ययुगीन कालखंडाकडे संक्रमण होत असताना राजकीय सामाजीक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक या प्रत्येक क्षेत्रात स्थित्यंतरे झाले आहेत.

मुस्लिम राज्यकर्त्यांना इतिहास लेखनात रूची होती. त्यांनी आपल्या दरबारातील मंडळीना, लेखकांना इतिहास लेखनाचे काम सोपविले. मध्ययुगीन काळात झालेल्या लिखाणामागील मुळ प्रेरणा धार्मिक होती. आपल्या धर्माच्या, विजयाच्या इतिहासाची नोंद तत्कालीन लेखकांनी घेतली. या ऐतिहासिक साधनांच्या उपलब्धतेमुळे मध्ययुगीन भारताचा इतिहास सलगपणे मांडता येतो.

या साधनांमध्ये ताम्रपट, शिलालेख कलाकृती इ. पूरातत्वीय साधनांचा समावेश होतो. आत्मचरित्रे, चरित्रे, प्रवासवर्णने, कागदपत्रे इ. पुरातत्वीय साधनांचा समावेश होतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सुलतानशाहीचा कालखंड आणि मोगलशाहीचा कालखंड असे दोन प्रमुख कालखंड आहेत. यातील पूर्व मध्ययुगीन कालखंड म्हणजेच सुलतानशाहीच्या ऐतिहासिक साधनांची माहिती पुढिलप्रमाणे.

**पूरातत्वीय साधने -**

पूर्व मध्ययुगाचा अभ्यास करण्यासाठी, इतिहास लेखनासाठी पूरभिलेखीय साधनांप्रमाणेच पुरातत्वीय साधने महत्वपूर्ण आहेत. पुराभिलेखीय साधनापेक्षा पूरातत्वीय साधने अधिक विश्वसनीय आहेत. कारण काही लिखित साधनात व्यक्तिनिष्ठपणा, पूर्वगृहदूषितपणा आढळतो. इतिहासात वस्तुनिष्ठता महत्त्वाची आहे म्हणूनच काही लिखानात व्यक्तिनिष्ठपणा आल्यामुळे त्या लिखाणास फारसे महत्त्वाचे स्थान इतिहासात नाही.

**नाणी -**

सुलतानशाहीतील शासन, पध्दती सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासण्यासाठी नाण्यांचा उपयोग होतो. या काळातील विपूल नाणी आजही उपलब्ध आहेत. या नाण्यात प्रामुख्याने हिंदू शासकांचे नाणे, आणि मुस्लिम शासकांचे नाणे असे दोन भाग पडतात. सुलतानशाहीतील गुलाम घराण्याचा संस्थापक कुतुबुद्दीन ऐबक याच्या नाण्यावर 'सुलतान म्हणजे ईश्वराचा प्रतिनिधी असे संबोधले आहे' सुलतान अल्तमशने प्रथम रूप्याची नाणी पाडण्यास सुरुवात केली शेरशहाच्या काळात टाकसाळींची संख्या 23 होती. 23 टाकसाळीतून शेरशहाची नाणी पाडली जात होती. याचाच अर्थ त्याच्या काळात आर्थिक व्यवहार वाढला होता. सुलतानशाहीतील नाण्यांवरून सुलतानांचीही माहिती मिळविण्यास मदत होते. अल्लाउद्दिन खिलजीने सोन्याची नाणी पाडली आणि त्यावर सुलतान व खलिफा यांचा निर्देश केला. नाण्यांवरून सुलतानांनी कोणते धार्मिक धोरण स्वीकारले हे लक्षात येते.

**पुराभिलेख :-**

यात शिलालेख, स्तंभालेख, लेणी व ताम्रपट या सर्व आलेखांचा समावेश होतो. यांच्या अभ्यासाच्या आधारे इतिहास लेखन केले जाते. पूर्व मध्ययुगात राजस्थानमधील शिलालेख याबरोबरच दक्षिण भारतामधील काही पूराभिलेखांच्या आधारे मध्ययुगीन विविध घटनांची माहिती मिळते.

**उत्खननातील अवशेष -**

मध्ययुगातील सत्ताधिशांची माहिती मिळवण्यासाठी उत्खननात दौलताबादचा किल्ला परिसरात झालेले उत्खनन यावरून सुलतानशाहीची माहिती मिळते. तसेच अहमदनगरच्या किल्ल्याच्या परिसरातील उत्खनन केले असता तेथील अवशेषावरून सल्तनतक काळाची माहिती मिळते. त्या काळातील स्थापत्य कला, चित्रकला या विषयी माहिती मिळते.

**एंतिहासिक स्मारके -**

सत्ता स्थिर झाल्यानंतर सुलतानांनी भारतामध्ये स्मारके, मस्जिद आणि मुस्लिम वास्तू भिन्न असल्यातरी त्यांच्या रचनेमध्ये बरेच साम्य होते. हिंदू आणि जैन मंदिराचे वैशिष्ट्य मध्यभागी चौक व सभोवताली स्तंभ असत. हेच वैशिष्ट्य मस्जिदीत पाहावयास मिळते. त्यामुळेच सुलतानानी भारतात आल्यानंतर त्यांनी भारतीय कारागीरांच्या मदतीने अनेक वास्तूंची निर्मिती केलेली आहे. मुळची भारतीय शैली आणि पश्चिम अशियाची इस्लामिक शैली यांच्या मिश्रणातून इंडो - इस्लामिक (मुस्लिम) शैली सुलतानशाहीच्या काळात निर्माण झाली.

कुतूबूद्दीन ऐबकाने कूवत उल - इस्लाम, कुतूबमिनार या भव्य वास्तू अलाई दरवाजा हे उत्कृष्ट प्रवेशद्वार बांधले. अल्तमशने आपल्या मुलाचे स्मारक म्हणून ओळखली जाणारी सुलतान गढी बांधली. याबरोबरच जामा मस्जिद, अल्तमशचा मकबरा इत्यादी स्मारके, प्रवेशाद्वारे सुलतानशाहीच्या काळात निर्माण झाले. त्याच्या आधारे सुलतानशाहीचा इतिहास अभ्यासता येतो. अशा प्रकारची ऐतिहासिक स्मारके इतिहास लेखनासाठी महत्त्वपूर्ण साधन आहेत.

**निष्कर्ष :-**

प्राचीन कालखंडावर प्रकाश टाकणाऱ्या साधनांपेक्षा मध्ययुगीन कालखंडावर प्रकाश टाकणाऱ्या साधनांचे स्वरुप बदललेले दिसते. प्राचीन काळातील ऐतिहासिक घटना जाणून घेण्यासाठी प्रामुख्याने भौतिक / पूरातत्वीय साधनांवर अवलंबून रहावे लागते. सुलतानशाहीचा अभ्यास करण्यासाठी विपूल प्रमाणात लिखित साधने उपलब्ध आहेत. विशेषतः फारशी आहेत. मध्ययुगीन काळातील ग्रंथ लेखक हे दरबारी लेखक होते. त्यामुळेच त्यांना विविध राजकीय, अन्य घटना, दरबारातील कटकारस्थाने, सुलतानांनी प्राप्त केलेले विजय, सुलतानांचे विलासपूर्ण जीवन या विषयीचे संपूर्ण ज्ञान असल्यामुळे त्यांनी चाकोरीबध्द लेखन केले. याचा परिणाम म्हणून त्यांच्या लेखनात सामान्य माणसांचे प्रश्न, समस्या, त्यांच्या जीवनातील विविध प्रसंग आलेले नाहीत.

या काळात सुलतानांची अवास्तव स्तूती झाल्याचे दिसते. बखरीमधील लिखाणात पूर्वग्रहदूषितपणा आढळतो. म्हणूनच इतिहास लेखन करत असताना या साधनांचा समकालीन इतर साधनांशी मेळ घालून, तपासून ऐतिहासिक सत्य शोधावे लागते.

सुलतानशाहीच्या काळात पूराभिलेखीय साधनांची उपलब्धता अधिक प्रमाणात असल्यामुळे सुलतानशाहीचा सलग इतिहास लिहिता आला. तसेच विविध सुलतानांची माहिती, तत्कालिन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतीक सत्यासत्यता तपासण्यास सुलतानशाहीचा इतिहास याच साधनांच्या आधारे उपलब्ध होवू शकला. म्हणूनच साधनांना महत्त्व प्राप्त झाले.

**संदर्भ :-**

1) दिनकर, रामधारीसिंह, संस्कृति के चार अध्याय, पृष्ठ 298, 310.
2) पन्नीकर के. एम., ए सर्वे ऑफ इंडियन हिस्ट्री.
3) डॉ. श्रीवास्तव ए.एल., मेडिवल इंडियन कल्चर, पृष्ठ 95.
4) डॉ. श्रीवास्तव ए.एल., दिल्ली सल्तनतक, पृष्ठ 399.
5) डॉ. ईश्वरी प्रसाद, भारतीय मध्ययुग का इतिहास, पृष्ठ 23.
6) शर्मा एल.पी., मध्यकालीन भारत, पृष्ठ 5.
7) डॉ. नागोरी एस.एल., मध्यकालीन भारत, श्री सरस्वती सदन, नई दिल्ली, पृष्ठ 151,152.

❑❑❑